**B.A. Part–I (Semester—I) Examination**

**(Modern Indian Languages)**

**MARATHI (Compulsory)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :— बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करताना गृहीत धरल्या जातील.

1. 'ध्येयांची पराकाष्ठा' या लेखातून साने गुरुजींनी युवा पिढीला भारतीय नीतिमूल्यांचा परिचय कसा घडविला आहे ?

**किंवा**

आजच्या धावपळीच्या जीवनात दीर्घायुषी आणि निरोगी राहण्यासाठी कोणकोणत्या घटकांची सुलभ माहिती अभय बंग यांनी सांगितली आहे ? 16

2. अन्वरशा फकीराच्या कनवाळू व सहिष्णूवृत्तीची ओळख लेखकाने कशी करून दिली आहे ?

**किंवा**

ग्रामजीवनातील सामूहिक जीवनाचा आविष्कार 'इर्जिक' या लेखातून कसा व्यक्त झाला आहे ? 16

3. (अ) वैदर्भीय शेतकऱ्यांची व्यथा व वेदना शंकर बडे यांनी कशी मांडली आहे ?

**किंवा**

संत ज्ञानेश्वरांच्या अभंगातून पांडुरंग भेटीची आर्तत्ता व आस कशी व्यक्त झाली आहे ? 8

(ब) व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याचे आवाहन 'आता' या कवितेत नामदेव ढसाळांनी कसे केले आहे ?

**किंवा**

संत सावता माळी यांनी आपल्या अभंगातून विठ्ठलाप्रतीचा जिव्हाळा कसा प्रकट केला आहे ? 8

4. (अ) लेखनविषयक नियमांची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उताऱ्यातील शब्द शुद्ध करून लिहा :

जनसंस्कृति हि जनजिवनाशी एकरूप झालेलि असते. माणासाच्या जिवणक्रमाचाच ति अवीभाज्य भाग असते. उलट मास समाजातिल संस्कृति हि केवळ सजावटिची बाब असते, प्रतिष्ठेचि खुन असते किंवा बाजारातिल खरेदि वीक्रिची वस्तु असते म्हणजेच ति खऱ्या अर्थाने संस्कृतिचि अणुपस्थितिच असते ! मास कल्चरचा भस्मासुर ज्या कशाला स्पर्श करतो ती गोष्ट नष्ट होते. संस्कृतितुन निर्मीतिचा आनंद मीळण्याएवजि संस्कृतिचेच रूपांतर उद्योगधंद्यात करून टाकणे हे तर उपभोगग्रस्त समाजाचे सर्वात गंभिर रोगलक्षन असते. 8

(ब) मुद्रितशोधन कसे करावे ?

किंवा

मुद्रितशोधनाच्या खुणांचा वापर करून उतारा शुद्ध स्वरूपात लिहा :

"जाते हो उद्या जाते चेकअपला डॉ. देशमुख उद्या भेटतात णा" "पन तु अशि सारखी या खोलित पडुन असतेस डॉक्टरांनि फिरायला सांगितलंय. पथ्यपाणी सांगितलय करतेस का सगळं नाही ना मग असच होणार. किती वेळेस सांगितलं बैठकीत बसत जा, टी व्ही बघ वाचन कर वर माझ्या खोलीत येऊन गप्पा मार. निदान सकाळसंध्याकाळ कॉलनीच्या कोपऱ्यापर्यंत फिरुन जा येत पा ऐकायला नको." 8

5. खाली बहुपर्यायी प्रश्न सोडवा :

(1) संपूर्ण बेजबाबदारीतून संपूर्ण जबाबदारीत एकदम उडी मारावयाची म्हणजे ती एक ______ उडीच झाली. 1

(अ) उंच (ब) लांब

(क) हनुमान (ड) लंका

(2) भारतीय संस्कृतीत ______ व पावित्र्य या दोन गुणांना अत्यंत मोठे स्थान आहे. 1

(अ) त्याग (ब) सौजन्य

(क) सत्यता (ड) वात्सल्य

(3) माझी शरीरयात्रा म्हणजे ______ सेवा आणि म्हणजेच ईश्वराची पूजा. 1

(अ) निष्ठेची (ब) समाजाची

(क) कृष्ठरोग्यांची (ड) वृद्धांची

(4) जे काम करताना थोडा घाम येतो व थोडा दम लागतो तो ______ प्रतीचा व्यायाम. 1

(अ) उच्च (ब) निम्न

(क) मध्यम (ड) योग्य

(5) अभय बंग यांना 2003 साली महाराष्ट्र शासनाने कोणता पुरस्कार दिला ? 1

(अ) महाराष्ट्र भूषण (ब) ज्ञानपीठ

(क) विदर्भवीर (ड) साहित्य अकादमी

(6) घरात चिलीपिली असती तर आंगणंही ______ दिसतात. 1

(अ) सुंदर (ब) नीटनेटकी

(क) लेकुखाळी (ड) गजबजलेली

(7) अन्वरशाला किती लेकरं होती ? 1

(अ) तीन (ब) चार

(क) पाच (ड) दोन

(8) 'अन्वरशा फकीर' हा लेख कोणी लिहिला ? 1

(अ) मधुकर केचे (ब) उद्धव शेळके

(क) मधुकर वाकोडे (ड) अरुण जाखडे

(9) ______ म्हणजे समूहमनाचा आविष्कार ! 1

(अ) इर्जिक (ब) संस्कृती

(क) साहित्य (ड) सण-उत्सव

(10) ______ यांना समजून घेतले नाही म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्थेची शोकांतिका सुरु झाली असे लेखकाला वाटते. 1

(अ) महात्मा गांधी (ब) विनोबा भावे

(क) साने गुरुजी (ड) महात्मा फुले

(11) 'पैल तो गे काऊ कोकताहे। ______ ' हा अभंग कोणी लिहिला ? 1

(अ) संत नामदेव (ब) संत तुकाराम

(क) संत रामदास (ड) संत ज्ञानेश्वर

(12) केशवसुतांचे पूर्ण नाव काय ? 1

(अ) कृष्णाजी केशव दामले (ब) कृष्णाजी केशव भावे

(क) कृष्णाजी केशव भाले (ड) यापैकी नाही

(13) कशाचा झेंडा उभारून जुलुमाचे तुकडे तुकडे करू असे कवी म्हणतात ? 1

(अ) क्रांतीचा (ब) बंडाचा

(क) मानवतेचा (ड) सत्याचा

(14) भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे।
______ नित्य गावे, या झोपडीत माझ्या।। 1

(अ) हरिनाम (ब) शिवनाम

(क) प्रभुनाम (ड) रामनाम

(15) हजारो वर्षांनतर काय हाती ठेवणारा फकीर लाभला असे कवीने म्हटले आहे ? 1

(अ) क्रांतिफुले (ब) सूर्यफुले

(क) रानफुले (ड) तेजफुले

(16) 'शेतकरी राजा' या कवितेत कुणाच्या व्यथावेदनेला कवीने वाचा फोडली आहे ? 1

(अ) शेतकरी (ब) कामकरी

(क) कष्टकरी (ड) यापैकी नाही